लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. २४ मार्च २०२५

# परिस्थितीशी लढला; एसआरपीएफ पोलीस बनला

## बावड्यातील समीर शेखचे यश : सेंट्रिंग कामगार पित्याचे पांग फेडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापुर :** वडील सेंट्रिंग कामगार, तर आई गृहिणी...वडिलांच्या मजुरीवरच घराची गुजराण. अशी ओढाताण किती दिवस करायची ही खंत त्याला मनाशी नेहमी बोचायची. ही परिस्थती बदलायची असेल तर आपणालाच धावावे लागेल ही खूणगाठ मनाशी बांधून तो भल्या पहाटे सहा-सात किलोमीटर धावायचा. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता अखंडपणे तो धावला अन् एसआरपीएफ पोलिस बनत तो जिंकलाही. कसबा बावडा येथील समीर



बशीर शेख या तरुणाचा या यशामागचा संघर्ष अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

बावड्यात राहणाऱ्या समीरने विवेकानंद कॉलेजमधून बी.कॉम.ची पदवी घेतली. मात्र, घरची परिस्थती नाजूक असल्याने तो येथील गॅस एजन्सीमध्ये काम करत होता. ही परिस्थिती बदलायची असेल तर शासकीय नोकरी मिळवावी लागेल ही खूणगाठ त्याने बांधली. सुरुवातीपासूनच राज्य राखीव पोलिस दलात (एसआरपीएफ) जाण्याचे ध्येय ठेवून त्याने तयारी सुरू केली. भल्या

**६ ते ७ कि.मी. भल्या पहाटे धावणे हा त्याचा दिनक्रम होता**

पहाटे तो बावडा ते गिरोली घाटापर्यंत रोज धावायचा. तेथून घरी आला की पुन्हा गॅस एजन्सीमध्ये कामाला जायचा. २०२४ मध्ये त्याने एसआरपीएफची परीक्षा दिली. लेखी आणि शारीरिक क्षमता चाचणीत तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. सध्या तो पुण्यात एसआरपीएफचे प्रशिक्षण घेत आहे.

### एजन्सी मालकाचा चांगुलपणा

ज्या गॅस एजन्सीमध्ये समीर कामाला होता. तेथील गॅस एजन्सी मालक इंद्रजित कारंडे यांनी त्याला पोलिस भरतीची तयारी करण्यासाठी बळ दिले. त्याचा सुटीमधील पगारही कापला जात नव्हता. विशेष म्हणजे समीरची निवड झाल्यानंतर मालक कारंडे यांनीच सर्वांना जेवण देत याचा आनंद साजरा केला.